पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८ लेखा विभाग
क्र. लेखा/१४/कावि/१८४/२०१७
दि. ८/ ३/२०१७

**विषय :- दि.३१/३/२०१७ अखेरची महसुली / भांडवली बीले अदायगी बाबत..**

**संदर्भ** :-१. मा.आयुक्त यांचे परिपत्रक क्र.आकक्ष /कावि/१५८/१६ दि.६/१०/१६
२. मा.आयुक्त यांचे परिपत्रक क्र.आकक्ष /कावि/१६०/१६ दि.६/१०/१६
३.मा.आयुक्त यांचे परिपत्रक क्र.आकक्ष /कावि/१७४/१६ दि.११/११/१६
४.मा.आयुक्त यांचे कार्यालयीन आदेश क्र.आक/कावि/१६१/१६दि.६/१०/१६
५.मा.आयुक्त यांचे कार्यालयीन आदेश क्र.आक/कावि/१६२/१६दि.६/१०/१६
६.मा.आयुक्त यांचे कार्यालयीन आदेश क्र.आक/कावि/१६३/१६दि.६/१०/१६

**परिपत्रक**

२/- म.न.पा.चे चालू आर्थिक वर्ष दि. ३१/३/२०१७ रोजी संपत असून चालू आर्थिक वर्षात सन २०१६ -१७ चे सुधारित अंदाजपत्रका नुसार उपलब्ध तरतुदींच्या मर्यादेत महसुली व भांडवली स्वरुपाची खर्चाची सर्व बिले दि.२४/३/२०१७ पर्यंत लेखा विभागाकडे न चुकता सादर करावी, जेणे करून सदर बिलांची तपासणी करून दि.३१/३/२०१७ पर्यंत सर्व बिलांची संबधितांना प्रत्यक्ष अदायगी करणे शक्य होईल. तथापि, अत्यावश्यक सेवांची देयके उदा.विद्युत बीले, पाणी बिले अशी बिले दि.२९/३/१७ पर्यंत सादर करणेस हरकत नाही.

सदर बिले सादर करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१) साधनसामुग्री, साहित्य खरेदी, सेवा, तसेच देखभाल दुरुस्ती कामे, भांडवली स्वरुपाची विकास कामे ई - बिले सादर करताना मूळ निविदा अटी – शर्ती / निवीदा नस्ती सह बिले सादर करावीत.

२) संदर्भिय परिपत्रकांनुसार निर्गमित केलेल्या आदेशा प्रमाणे पूर्तता झालेची खात्री करुन नंतरच यापुढे बिले लेखा विभागाकडे पाठविणे बाबत जाणीवपूर्वक दक्षता घ्यावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

**प्रति :-**
**सर्व संबंधित शाखाप्रमुख**